# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर


ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

Fax २२६६१२३९, Tel. २२६६५२३३, Email : collector_mumbaicity@maharashtra.gov.in

**(भूमापन व भूमि अभिलेख शाखा)**


क्रमांक : सीएसएलआर/एसॲण्डएलआर-१ व २/टे-१/कांदळवन तक्रारी/२०१९

दिनांक : १० /०१/२०१९ जा. क्र. 79

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

**विषय :** कांदळवनाच्या ऱ्हासाबाबतच्या तक्रारीच्या पूर्तता अहवाल.
Destruction Of Mangroves बांद्रा व माहिम रेल्वे स्टेशन जवळील

**संदर्भ :-** सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष-1/ल.ले./164/2018 दि.10/12/2018 रोजीचे पत्र. (प्राप्त दि. 13/12/2018).

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित यांचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. सुमित पाटील, यांनी दि.२९/११/२०१८ रोजी कांदळवनाच्या/ पाणथळाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## <u>कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवालाचा नमुना</u>

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. सुमित पाटील, दि.२९/११/२०१८ |
| २. | तक्रारीचा विषय | Destruction Of Mangroves बांद्रा व माहिम रेल्वे स्टेशन जवळील |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका. | बांद्रा व माहिम रेल्वे स्टेशन जवळ |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांच्या समवेत दि.१७/१२/२०१८ रोजी या कार्यालयातील श्री.बी. व्ही तोरस्कर, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक यांचेकडील श्री. डी. एल. झुगरे, (वनरक्षक दादर/ कुलाबा) |
| ५. | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | स्थळपहाणी वेळी तानसा पाईप लाईनच्या पलिकडे बांद्रा- माहिम रेल्वे ट्रैक जवळ असलेल्या तिवरांची झाडांत असलेले पाणी हे करड्या रंगाचे असलेचे दिसून आले.स्थळपहाणी वेळी सद्यास्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला आढळून आला नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | --- |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तिंची नांवे व पत्ता | --- |
| ९. | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली असून, यासोबत संयुक्त स्थळपाहणी केली असून, स्थळ पहाणी अहवाल,गूगल नकाशा व पंचनामा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

**(शिवाजी जोंधळे)**
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर**

**प्रत :-**

1) सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय.302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-400 001.



दिनांक - १७/१२/२०१८

# पंचनामा

आम्ही खाली सह्या करणार पंचलोक राहणार - माहीम कारण विचारले वरुन पंचनामा लिहून देतो की.

आज दिनांक १७/१२/२०१८ रोजी सकाळी ठीक १२:३० वाजता प्रत्यक्ष जागेवर जाऊन वन ~~रक्षक~~ श्री. दिपक डुगरे व तक्रारदार श्री सुमित पाटील यांचे समवेत परि. भूमापक यांनी स्थळ पहाणी केली. स्थळ पहाणी वेळी तानसा पाईप लाईन पालिकडे व बांद्रा-माहीम रेल्वे ट्रॅक जवळ असलेल्या तिवरांच्या झाडांकडील ~~पाण्यात~~ पाणी ~~करड्या~~ रंगाचे दिसत असल्याचे दिसून आले त्या बाबत वन ~~रक्षक~~ यांनी दिनांक १६/१२/२०१८ रोजी अन्य तक्रारीचे अनुषंगाने स्थळ पहाणी केली असता सदर पाण्याचे नमुने घेतले असून ते तपासण्यासाठी प्रयोगशाळेमध्ये सदर तक्रारदार यांनी नेले बाबत सांगण्यात आले. स्थळ पहाणीचे वेळी सद्यस्थितीत कांदळवनांची / तिवरांचे झाडांचा -हास झालेचे दिसून आले नाही. या पूर्वी देखील सदर बाबत तक्रारीचे अनुषंगाने वन विभाग यांचेकडून तपास काम चालू आहे. सदर पंचनामा परि. भूमापक यांनी आम्ही सांगितल्या प्रमाणे त्यांनी लिहिला तो वाचून समजावून सांगितला असून तो आम्हांला मान्य असून खालसही करीत आहोत.

समक्ष

[signature]
17/12/2018
(बी. डी. तोरस्कर)
परि. मापक

[signature]
व. र. दादर
मुंबई

[signature]
व. र. कुर्ला
मुंबई

[signature]
17th Dec. 2018
@02:15 pm
[illegible] Patil (8097282388)

पंच

[signature]
Shahadan (स्थानिक)

[signature]
17/12/2018
Amit Patel.
9920117556.

## स्थळपाहणी अहवाल

**मा.सविनय सादर,**

विषय :- कांदळवन संरक्षण संवर्धन.
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत

संदर्भ :- या कार्यालयाकडील

उपरोक्त विषयांकित कामी दि.17/12/2018 रोजी तक्रार अर्जदार श्री.सुमित पाटील ,वनरक्षक दादर व ,वनरक्षक कुलाबा यांचे समवेत सदर ठिकाणी स्थळ पहाणी केली.

स्थळ पहाणी वेळी तानसा पाईप लाईनच्या पलिकडे बांद्रा-माहिम रेल्वे ट्रैक जवळ असलेल्या तिवरांची झाडांत असलेले पाणी हे करड्या रंगाचे असलेचे दिसून आले.

सदर पाण्यामध्ये रासायनिक पदार्थ सोडल्यामुळे सदरचा रंग करडा झाला असल्याने भविष्यात कांदळवनाचे/ तिवरांच्या झाडांचा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. असे तक्रारदार अर्जदार यांचे म्हणणे आहे.त्या अनुषंगाने वनरक्षक यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि.16/12/2018 रोजी दूसऱ्या एका तक्रार अर्जाचे अनुषंगाने स्थळ पहाणी केली त्यावेळी त्या पाण्याचे नमुने तपासणी कामी प्रयोग शाळेत घेवून गेले असले बाबत वनरक्षक याने स्थळपाहणी वेळी सांगितले.

5/2019

सदरचा रिपोर्ट आलेवरच पुढील कारवायी करता येणे शक्य आहे असे तक्रार अर्जदार यांचे समक्ष सांगण्यात आले. तक्रार अर्जदार यांनी आलेला रिपोर्ट आम्हाला कळवावा असे वनरक्षक दादर , व कुलाबा यांना सांगितले.स्थळपाहणी वेळी सद्यस्थितीत कादंळवनाचा ऱ्हास झालेला आढळून आला नाही.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती माननीयांचे अवलोकनार्थ सविनय सादर.

जिल्हाधिकारी कार्यालय
महसुल शाखा / नगर भुमापन शाखा
आवक क्रमांक :- 194
दिनांक 9/1/19
अधिक्षक

5/01/2019
(बी. डी. तोरस्कर)
परि. भूमापक